# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## विद्यार्थी कल्याण मंडळ

परिपत्रक क्र. १८०/२०१६

''श्रीमती निलीमाताई पवार सुवर्णपदक २०१६–१७''

कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना (विद्यार्थिनीकरीता)

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्नित महाविद्यालय, मान्यताप्राप्त संस्था तसेच विद्यापीठ विभागातील कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजनेत उत्कृष्ठ कार्य करणाऱ्या **विद्यार्थीनीस** २०१६ पासून दरवर्षी 'श्रीमती निलीमाताई पवार सुवर्णपदक' प्रदान करण्यात येणार आहे. कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजनेत उत्कृष्ठ कार्य करणाऱ्या विद्यार्थीनीस विद्यापीठाच्या पदवीप्रदान समारंभात हे सुवर्णपदक प्रदान करण्यात येणार आहे.

या परिपत्रकाद्वारे सर्व प्राचार्य/संचालक यांना कळविण्यात येते की, 'श्रीमती निलीमाताई पवार सुवर्णपदक' साठी खाली उल्लेख केलेल्या नियम व अटी नूसार विद्यार्थीनीची माहिती आवश्यक कागदपत्रे व शिफारशीसह **गुरुवार, दि. २७ ऑक्टोबर, २०१६ पूर्वी** मा. संचालक, विद्यार्थी कल्याण मंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे प्रत्यक्ष (हस्तपोच) सादर करावे. तद्नंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

श्रीमती निलीमाताई पवार सुवर्णपदकाकरीता आपण आपल्यास्तरावर योग्य ती कार्यवाही करुन सर्वोत्तम असे नांव कळविणे आवश्यक आहे.

नियम व अटी :

१) सदर सुवर्णपदक 'कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका' योजनेत उत्कृष्ठ कार्य करणाऱ्या **एका विद्यार्थिनींस** प्रदान करण्यात येईल.

२) भविष्यात 'कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना' बंद झाली तर फक्त ग्रामीण भागातील कला विद्याशाखेतील सर्वोत्कृष्ठ विद्यार्थीनीस सदर सुवर्णपदक प्रदान करण्यात येईल.

३) सुवर्णपदकास पात्र असणाऱ्या विद्यार्थीनींने अध्यादेश क्रमांक १०९, ११० व १४३ ची पूर्तता करणे आवश्यक आहे.

४) अध्यादेश क्रमांक १६८ नुसार परीक्षेस बसणारी विद्यार्थीनी सुवर्णपदकास पात्र ठरणार नाही.

५) सुवर्णपदकास पात्र असणाऱ्या विद्यार्थीनीने महाविद्यालये/विद्यापीठ शैक्षणिक विभागामध्ये पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रमास नियमित प्रवेश घेतलेला असावा.

६) सुवर्णपदकास पात्र असणाऱ्या विद्यार्थीनीची नियमित अभ्यासक्रमात आणि कमवा व शिका योजनेतील उपस्थिती किमान ७५ टक्के असणे आवश्यक राहील. या संदर्भात मा. प्राचार्यांनी दाखला देणे आवश्यक राहील.

७) विद्यार्थीनीस गैरशिस्त/नैतिकता/परीक्षेतील गैरप्रकार इ. बाबत शिक्षा झालेली नसावी.

८) सुवर्णपदकास पात्र असणाऱ्या विद्यार्थीनीच्या शैक्षणिक प्रगतीबरोबर इतर उपक्रमांतील सहभाग उदा. अभ्यासेतर उपक्रम, क्रीडा, समाजसेवा, कला, देशभक्तीपर उपक्रम, राष्ट्रीय छात्र सेना (N.C.C.), राष्ट्रीय सेवा योजना (N.S.S.), इ. विविध क्षेत्रातील कामगिरी/नैपुण्य विचारात घेण्यात येईल.

९) सुवर्णपदकास पात्र असणाऱ्या विद्यार्थीनीचा कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजनेत नियमित किमान २ वर्षे सहभाग असावा.

१०) सुवर्णपदकास पात्र असणाऱ्या विद्यार्थीनीची निवड करण्याकरीता महाविद्यालयीन पातळीवर मा. प्राचार्य यांचे अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे समिती गठित करुन अर्जाची छाननी करावी.

१) मा. प्राचार्य (अध्यक्ष)

२) महाविद्यालयाच्या विविध शाखांच्या तीन प्राध्यापिका

३) विद्यार्थी कल्याण अधिकारी (सचिव)

११) प्रत्येक महाविद्यालय/संस्थेने/विद्यापीठ पातळीवरील सर्वोत्तम असे एकाच विद्यार्थीनीचे नाव कळवावे.

वरील नियम व अटी यांची पूर्तता न करणारे अर्ज बाद ठरविण्यात येतील.

**विद्यार्थी कल्याण मंडळ**
गणेशखिंड, पुणे – ७
संदर्भ क्र. :२०१६–१७/४१९
दिनांक : १० ऑक्टोबर, २०१६

१०।१०
संचालक,
विद्यार्थी कल्याण मंडळ